राज्यातील जिल्हा खनिज प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ व महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळ यांचे खालील वर्षांचे लेखापरिक्षण अहवाल विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे:-

| अ.क्र. | जिल्हा खनिज प्रतिष्ठान | वार्षिक अहवाल वर्ष | विलंबाची कारणे |
|---|---|---|---|
| १. | ठाणे, पालघर, पुणे, सातारा, जालना, हिंगोली, वर्धा, रत्नागिरी | २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५,२०२५-२६ | खाण व खनिजे (विकसन व विनियमन) सुधारणा अधिनियम, २०१५ हा केंद्र शासनाच्या दिनांक २७.०३.२०१५ रोजीच्या अधिसूचनेन्वये अधिसूचित केला आहे. त्यानुसार खाण व खनिजे (विकसन व विनियमन) सुधारणा अधिनियम, २०१५ मधील कलम ९ B मधील तरतुदींनुसार राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये खाणबाधित क्षेत्र व व्यक्तींच्या विकासाकरिता दि.०१.०९.२०१६ रोजीच्या शासन अधिसुचनेन्वये जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या स्थापना, रचना व कार्यपध्दतीबाबतचे नियम विहीत करण्यात आले आहे. त्यानंतर केंद्रिय खाण मंत्रालयाने वेळोवेळी दिलेल्या जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत असलेल्या नियामक परिषद व व्यवस्थापकीय समितीच्या संरचनेमध्ये बदल करण्यात आलेले आहे. त्यामुळे जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत नियामक परिषदेच्या संरचनेमध्ये देखील बदल करण्यात आले आहे. तसेच बहुतांश जिल्ह्यामध्ये नियमित स्वरुपात जिल्हा खनिकर्म अधिकारी यांची नियुक्ती पुरेशी संख्या उपलब्ध नसल्याने करण्यात आलेली नाही. याचबरोबर जिल्हा खनिज प्रतिष्ठानची नोंदणी धर्मादय कार्यालयाकडे नसल्याने, सनदी लेखापाल यांची नियुक्ती केलेली नसल्याने वार्षिक लेखापरिक्षण अहवाल तयार करण्यास विलंब झालेला आहे. |
| २. | रायगड, लातूर | २०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ | |
| ३. | सिंधुदुर्ग, सांगली, सोलापूर, नंदुरबार, अहिल्यानगर, यवतमाळ, गोंदिया | २०२३-२४, २०२४-२५, २०२५-२६ | |
| ४. | कोल्हापूर, परभणी, अकोला, अमरावती, नागपूर, गडचिरोली | २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ | |
| ५. | मुंबई उपनगर, नांदेड | २०२२-२३, २०२३-२४ | |
| ६. | चंद्रपूर, धाराशीव | २०२३-२४, २०२४-२५ | |
| ७. | नाशिक | २०२४-२५ | |
| ८. | भंडारा | २०२४-२५, २०२५-२६ | |
| ९. | बुलढाणा | २०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३ | |

| अ.क्र. | महामंडळाचे नाव | वार्षिक अहवाल वर्ष | विलंबाची कारणे |
|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ | २०२२-२३, २०२३-२४ | अपुरा कर्मचारी वर्ग |
| २. | महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महमंडळ | २०२२-२३, २०२३-२४ | |

(लक्ष्मीकांत ढोके)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

D:\data03.07.2023\Yash\2026 Work\वार्षिक अहवाल\प्र.क्र.34-2026--वार्षिक अहवाल.docx